# निविदा नोटीस सन २०२५-२६

सातारा जिल्हा परिषद अंतर्गत खावली गोडावून येथील जूने व निरूपयोगी भांडार साहित्याची विक्रीकरणेसाठी मोहोरबंद निविदा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग उत्तर, जिल्हा परिषद, सातारा यांचे कार्यक्षेत्रातील योग्य त्या निविदाधारकांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना उप अभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून दिनांक १७/०४/२०२५ पासून दिनांक २४/०४/२०२५ पर्यंत देण्यात येईल. भरुन पाठविलेल्या निविदा स्विकारणेचा अंतिम दिनांक २५/०४/२०२५ असून निविदा सायं. ५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच निविदा उघडण्याची तारीख २८/०४/२०२५ ही असून वेळ सकाळी ११.०० वाजता असून व शक्य झाल्यास त्याच दिवशी हजर असलेल्या पुरवठादारा समक्ष उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा मंजूर करण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

| अ.नं. | साहित्याचा प्रकार | अंदाजित वजन (कि. ग्रॅम मध्ये) | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत रुपयांत |
|---|---|---|---|---|
| १ | पत्रा, कपाट इ. | १४५० | | |
| २ | लोखंडी साहित्य. | १७०० | | |
| ३ | लाकूड साहित्य | ३००० | १०,०००/- | २०००/- |
| ४ | प्लॅस्टिक साहित्य | ४५० | | |
| ५ | इलेक्टानिक साहित्य | ७०० | | |

**टिप** :- १) कोऱ्या निविदा व अटी यांचा फॉर्म जिल्हा परिषद सदरी "१५ संकीर्ण इतर जमा निविदा फॉर्म किंमत कोड क. आर-१५०४" या अर्थ शिर्षाखाली वर नमूद केलेली कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत (ना परतावा) जिल्हा मध्यवर्ती महकारी बँकेत भरुन त्याचे चलन दाखविल्यास उप अभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद सातारा या कार्यालयात उपलब्ध होतील. सदरची निविदा ही दोन लखोटा पद्धतीने सादर करणेची आहे. लखोटा क्र १ मध्ये अ) बयाणा रकमेचा धनाकर्ष ब) वस्तु व सेवा कर नोंदणी दाखला क) आधार कार्ड व पॅन कार्ड ची छायाप्रत व लखोटा क्र. २ मध्ये फक्त भरलेली निविदा सादर करणेची आहे.

२) बयाणा रक्कम ही मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि. प. सातारा यांचे नांवे डिमांड ड्राप्ट काढून लखोटा क्र १ मध्ये जोडावे.

३) लखोटा क्र १ मध्ये वरील आवश्यक कागदपत्र असल्याशिवाय लखोटा क्र २ उघडला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा.**